**<u>नियमीत दिवाणी मुकदमा नं. २३/२०२२</u>** **निशाणी २७ पुढे**

<u>सुधा निरगुडे वि. कोंडाजी निरगुडे व इतर.</u>

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री. व्ही. सी. पगार अधिवक्ता</u>**

आता साक्षीदारास खरेदीखत क्र. ७२६४/२०१४ मधील सूची क्र. ०२ ची सत्यप्रत दाखविण्यात आली तो खरा व बरोबर आहे. त्यास नि. ४४ देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि. ४४ वरील सूची क्र. ०२ वर नमूद दस्त हो हक्कसोड पत्राचा होता. हे म्हणणे खरे नाही की, राहीबाई व इतर १६ लोकांनी बाळासाहेब पगार व इतर ५ यांचे हक्कात दिलेले हक्कसोड पत्र हे गट नं. ५३९ हया मिळकती बाबत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी खरेदी घेतलेल्या मिळकतीच्या सातबारा उता—याला राहीबाई व इतर १६ यांची देखील नावे होती. हे म्हणणे खरे आहे की, मी संपत कारभारी व इतर ११ यांचेकडून खरेदी घेतलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, राहीबाई व इतर लोकांचे गट नं. ५४१ मध्ये हक्क असतांना त्यांचे हक्क डावलून तुम्ही खरेदीखत केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, खरेदी दस्त क्र. ७२६४/१४ चा दस्त दुयम निबंधक यांची फसवणुक करुन दस्त क्र. ७२६३/१४ बनावट जोडून खोटे खरेदी खत केले. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ५४१ मध्ये राहीबाई व इतर १६ यांचा मालकी हक्क व कब्जा आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ५४१ चे माझे हक्कात झालेले खरेदीखत हे बेकायदेशीर आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ५४१ मध्ये माझी स्वतंत्र मालकी व कब्जा नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी विरुध्द खोटया मजकूराचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत.

माझे समक्ष,

LAXMIKANT CHANDRAKANT WADIKAR
Digitally signed by LAXMIKANT CHANDRAKANT WADIKAR
Date: 2025.09.22 11:09:21 +0530

**(लक्ष्मीकांत चं. वाडीकर)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सिन्नर.

ठिकाण— सिन्नर
दिनांक— २०.०९.२०२५